Impact Factor - 6.625 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**Peer Reviewed & Indexed Journal**

**October 2019 Special Issue - 198**

## गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना



अतिथि संपादक :
डॉ. अजयकुमार मोहबंसी
प्राचार्य,
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोलपंप जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक संपादक
डॉ. राजेंद्रप्रसाद पटले
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप
जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक सहसंपादक
डॉ. आर. आर. चौधरी
डॉ. हरगो...

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Principal
Smt Rajkamal Baburao Tidke
Mahavidyalaya Mouda

Smt. Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya Mouda SEAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 198 : गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना
ISSN : 2348-7143
October-2019

# म. गांधीजी संकल्पित हिंद स्वराज्य
## ग्राम – स्वराज्य

डॉ. मुकूंदा गोपालराव मेश्राम
श्रीमती रा. बा. तिडके महाविद्यालय मौदा, जि. नागपूर

प्रस्तावना –

विस्कळीत दशेला व्यवस्थित दिशा देवून उन्मत वैचारीक व व्यवहारीक नशेला दुर्दशेची जाणीव करून देताना विनाशापासून परावृत्त करण्याची रणगर्जना करीत उदात्त अभ्युदयाच्या आशा आकांक्षाचा उत्तुंग अन्वयार्थ स्व–कर्तुत्वाने लावून लोकांच्या विवेकाला विलक्षण प्रभावाने पल्लवीत करतात. त्यांना 'महात्मा' मानले जाते. त्यांच्या ठायी स्वार्थ अजिबात नसतो; असतो तो फक्त सर्वार्थ. प्रचलित, प्रस्थापित व्यवस्था प्रवाहाच्या विरोधात तर्कशुध्द, तत्वशील ध्येयधोरणे आखून त्यांची पराकाष्ठेने अंमलबजावणी करण्याची तशी विजिगीषू सिध्दता अगणयतम नगण्य लोकांमध्ये असते. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे रणांगणातील अग्रणी योद्धा मोहनदास करमचंद गांधी यांचे अद्भूत नेतृत्व आणि असीम कर्तृत्व केवळ भारतालाच नव्हे तर अवघ्या जगाला निरंतर दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशित करीत राहील. दैदिप्यमान प्रेरणेचा उज्वल स्त्रोत ठरेल. म्हणूनच त्यांना विनम्रभावे महात्मा म्हणतात. त्यांच्या मृत्यूनिमीत्य आनंदाने पेढे वाटणाऱ्या वेडयांची कीव करावीशी वाटते. माणसांना मारणे सोपे असते. उत्कृष्ट विचारांचा अंत निकृष्ट विकृती कधीच करू शकणार नाही. गायीचं लोभस कातड पांघरून रुबाड कोल्ही कोणती संस्कृती शिकविणार? राजकारणी लोकांचे गून्हेगारी जगताशी संबंध, भ्रष्टाचाराचे प्रशासनात गौडबंगाल, मिलावटखोर धंदेवाईक (उदा. दूधातील भेसळ इ.) डॉक्टरांचे कत्तलखाने (मानवी अवयवांची तस्करी, भ्रुणहत्या) रंगेल बोकेसंन्याशांच्या जंगी फौजा, बोफोर्स ते राफेल घोटाळे, मेहुल चोकसी, नीरव मोदी, विजय माल्या इ. दांभिकांची पैदास, डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे, कुलगूरू डॉ. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या अशी प्रकरणे विचारपटलावर आली की, ह्दयात कासावीस होते. लोकशाहीचे वाटोळे करणाऱ्या घोटाळेबाजांना कोणत्या गटारगंगेत अंतिम स्नानासाठी डुबवावे कळत नाही. भ्रष्टाचार, हिंसाचार, दंभाचार इ. विकृतींचे तांडवनृत्य समाप्त करण्यासाठी म. गांधीजींच्या विचारांशिवाय तरणोपाय नाही. खासकरून कृषिप्रधान ग्रामीण भारतात देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या महाराष्ट्रात २०११ ते २०१८ पर्यत १८,००० च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. तलावात पाणी नाही तर मुतू काय? भ्रष्टाचारी निकृष्ट कामाची झाकाथापी करण्यासाठी खेकडयांनी तलावाची पाड फोडली म्हणणारे नेते दस्तुरखूद्द महाराष्ट्रात निपजल्याचे पाहून वर्धेच्या सेवाग्रामला लाज नक्कीच वाटली असेल. १८९३ साली गांधीजी दक्षिण आफ्रिकेत व्यवसायानिमीत्य गेले. तेथे युरोपातील गोऱ्या लोकांनी मुलनिवासी निग्रोंच्या जमिनी बळकावल्या होत्या. तेथील सोन्याच्या–हिऱ्यांच्या खाणी ताब्यात घेण्यासाठी व्यापारी सूंदोपसूंदी सुरू होती. यूरोपीयन औद्योगिक क्रांतीने जोर पकडला होता. व्यापार व बाजाराने संपूर्ण विश्व बेजार होवून ईर्ष्या–स्पर्धा–द्वेष याला उधाण आले होते. म. गांधीजी निरीहभावाने चिंतनमंथन करत होते. १९०९ साली वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी 'हिंद स्वराज्य' नामक पुस्तक लिहीले. आणि त्यातील विचारांवर ते शेवटपर्यंत ठाम होते. त्यात प्रेम–धर्म (सहीष्णूता), अहिंसात्मक आत्मबलीदान (सत्याग्रह) आणि स्वयंसिध्दता याविषयी उत्तम विवेचन केलेले आहे. त्यात इस्पितळे, कारखाने, वाहतूक यातून फोफावलेली लंपटगिरी उघड केलेली आहे. ते पुस्तक लहान

Smt Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya Mouda SEAL
Principal
Smt Rajkamal B... Mahavidyalaya

ISSN : 2348-7143
October-2019

मुळापासून ते शेंगमोळ्यापर्यंत वाचून विचारप्रवण होण्यास उपयुक्त आहे असा प्रबळ आशावाद त्यांनी अभिव्यक्त केला.

**अहिंसात्मक सत्याग्रहाचा अन्वयार्थ :–**

म. गांधीजींच्या विचाराचे प्रसवस्थान धर्म आहे. तथापि जैन, पारशी, मुस्लिम, ख्रिश्ती, हिंदू अशी विभाजनकारी संकीर्णता त्यांना मान्य नाही. त्यातील दारूण घालविणारी मुलगामी करूणा त्यांना अधिक अहर्निश वाटते. दुनियेत क्षणभंगूर कालावधीसाठी जन्माला आलेल्या मनुष्यबिंदूने मानव्यसिंधूचे व्यर्थ नि अनर्थकारी विभाजन करण्यात हशील नाही. 'जहरी सर्प वेटोळ्यातील मत्सदर्प' निरूपयोगी आहे. संस्कृती–सभ्यतेतील विकृती घालविण्यासाठी म. गांधीजींचे धर्मानुवर्ती वैचारीक परीक्रमण दिसते. मूलत: त्यांच्यावर "दि लाईट ऑफ एशिया" या ग्रंथाचा सखोल प्रभाव दिसतो. स्वामी विवेकानंद प्रणीत बुध्ददेवाचे व्हीजन (दृष्टी) आणि मिशन (सृष्टी) चा निदिध्यास त्यांना लागलेला होता. रस्कीन, थ्योरो, टॉलस्टाय या कर्मवीरांना ते आदर्श मानत होते. त्यातून त्यांची सत्य आणि अहिंसेविषयीची संकल्पना प्रस्फूटीत झाली. 'सत्य' हा शब्द 'सत्' या शब्दापासून अविष्कृत होतो. त्याला इंग्रजीत म्पेजमदबम हा पर्यायी शब्द आहे. प्रत्येकाच्या अस्तित्वाचा पवित्र हेतू त्यात अनुस्यूत आहे. स्वतःचे अनन्य वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दुसऱ्याचे अस्तित्व समाप्त करण्याचा अधिकार कोणासही असूच शकत नाही. दुसऱ्याच्या जिवीत खुशहालीची खबरदारी घेणारी प्रगतीमान नितीमत्तेची संहीता म्हणजे धर्म होय. नश्वर मनुष्याने स्वतःच्या आसूरी आकांक्षा अभिधारणेने इतरांना उध्वस्त करण्याला प्रारंभ केला की, धर्मस्थानी अटळ असते हे गांधीजींना कळलेले होते. मनुष्याने नैसर्गीक घटक म्हणून जगावे. निकृष्टी सुखोपभोगी दुष्टपणे स्वतःच्या ऐषोरामासाठी नैसर्गिक भांडारालाच स्वतःच्या सूखाचे साधन बनवितो. साधनसंपत्ती संग्रहणाच्या अपरिमित लालची दुराचाराने अनभिषिक्त साम्राज्य उभारले जाते. यावर सत्याने मात करता येवू शकते. कार्लमार्क्सचा साम्यवाद पतन कामगारांची कैफीयत मांडतो. भांडवलशाहीबरोबर भांडवलदारांच्या उच्चाटनाचे आव्हान करतो. सामुदायिक वितरणप्रणाली सुरळीत करण्यासाठी टोकाची भूमिका घेण्याची गरज नाही. 'मारो–लुटो–काटो' हा नरसंहारक मार्ग त्यांनी अमान्य केला. समस्त भूतदया समजण्यासाठी शिखरसौजन्य अनिवार्य आहे. बुध्दवंदनेत "पाणातीपाता वेरामणी सिक्खापदं समादियामि" हा संकल्प दिलेला आहे. समस्त प्राणीमात्राविषयी करूणा बाळगण्याचा तो कृतसंकल्प होय. हिंसाचारापासून अलिप्त राहण्याचा तो दृढसंकल्प आहे. म्हणूनच 'बुध्द की युध्द' असा प्रश्न जगापुढे आहे. म. गांधी म्हणतात– आधी एक भाला हाती असायचा. शौर्य शिकस्त व्हायची. आता एक बॉम्ब लक्षावधी – कोटयावधींचा नरसंहार करतो. याला विकास म्हणणार काय? आजारी यावेत म्हणून दवाखाने आहेत. डॉक्टर तंत्रज्ञ बनून बिघडलेल्या यंत्राला दुरूस्त करणाऱ्या तंत्रज्ञाप्रमाणे वागतात. माणूसकी नाही. हल्ली मानवी देहाचे सौदागर तयार झालेले दिसतात. स्वाभाविक मानवता घालविणाऱ्या विकारांना प्रतिबंधित करणारी यंत्रणा बंधूभावातून येवू शकते. त्यांनी प्रतिपादन केलेली अहिंसा म्हणजे 'जागतिक बंधूभाव' होय. वासनांध मस्तवाल धर्मपिसाटांकडून धर्माची अपेक्षा काय करणार?

त्यासाठी निर्मल शुचिता, पवित्र साधेपणा, स्वेच्छापूर्ण दारिद्रय, उत्स्फूर्त सेवाभाव पाहीजे. हृदयपरीवर्तनासाठी मनोनिग्रहाची तयारी आवश्यक असते. सत्याग्रही व्यक्ति द्वेष, मोह, माया या विकारांपासून अलिप्त असतो. दुसऱ्याला अडचणीत संकटात टाकणे, कुत्सित अवहेलना करणे, मनोभंग करणे अनुचित मानतो. म. गांधीजींनी संकल्पिलेले प्रशिक्षित सत्याग्रही तयार झाल्यास ग्रामीण भारताचा कायापालट होवू शकतो. रोजगार उद्योगाअभावी आज खेडे बकाल पडत आहेत. शहरी मस्ताळ जहर गावात ठाण मांडत आहेत.

गावातील दूध–दूभत्यांची जनावरे संपली. त्यांची जंगली कुरणे संपली. हॉर्मोसाठी अभयारण्ये आली. फार्म हाऊस उभे होतांहेत. गावागावांमध्ये दारूची दुकाने निकष्टी, मतिमंद, वाचाळवीरांची मांदियाळी आणते.

**म. गांधीजी प्रणित ग्रामराज्य :–**

पांढरपेशा वर्ग दिमाखदार मिजासगिरीत वैभवात स्वनामधन्यता मानतो. कर्मचाऱ्यांपेक्षा अधिकाऱ्यांच्या लोभी वृत्तीने झपाटतो. कपाटाचे दार उघडताच कपड्यांचा ढिगारा खाली पडतो. परंतु उतरून टोप्याची वृत्ती नाही. खेडेगावी एका टोकावर कोणी आजारी असल्यास दुसऱ्या टोकाहून तोडाला चवीसाठी लोणचं पाठवितात. मय्यत झाली की सगळे सहकार्य–सहभाग करतात. शहरात शेजारच्या लोकांची नावे माहीत नसतात. सुखदु:खे काय जाणणार? हा पराकोटीचा एकाटपणा गांधीजींना मान्य नव्हता. अस्सल मानवी संस्कृती ग्रामीण जीवनात आहे. म्हणून ग्राम स्वावलंबनाचा मंत्र त्यांनी दिला. गावांमध्ये लघुउद्योग, कुटिरोद्योग, कृषी संबंधित सहाय्यकारी उद्योग त्यांना महत्वाचे वाटतात. गांधीजींचे आश्रम विश्रामाचे आमिषाने नव्हे. प्रत्येकाने स्वतःचे भुकनिवारणार्थ संसाधनांसाठी श्रम अपरिहार्य आहेत. 'श्रमाची भाकरी' हाच सज्जनाचा मूलमंत्र. मुफ्तखाऊ दूर्जनाचा भूईभार कमी व्हावा. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सक्षम पंचायत राज त्यासाठी आवश्यक. कुऱ्हाडीच्या नेतृत्वाचे ते उगमस्थान आहे. शहरी दांभिक बातेबबालांचा दळभद्री नादानपणा प्रतिबंधित करण्यासाठी त्याशिवाय तरणोपाय नाही. ए.सी.युक्त दारबंद केबिनमधील योजना गावाच्या गल्लीसाठी निरुपयोगी ठरतात. दांभिक राजकारण, दारूचे गुत्ते, 'खाओ पिओ, मजा मारो' पार्टीबाजी नको. गिरावरच्या योजना गावात बनवाव्यात. लोकांना निर्भय बनवा. परीश्रमी उद्योगी बनावा. परीश्रमाने उत्तम आरोग्य, निरोगी समाज निर्माण होईल. डॉक्टर पेक्षा भंगी श्रेष्ठ. कारण डॉक्टर आजाऱ्याची वाट पाहतो. भंगी स्वतःच्या कार्याने आजाराचेच निर्मूलन करतो. तेव्हा अंगिकृत कार्य हीन मानू नये. दवाखाने म्हणजे आजाराला निमंत्रण, पोलीसठाण्यांच्या उभारणीत गुन्हेगारींची आलबेल, यंत्रयुगामूळे कारखान्यांतील बेरोजगारी, व्यापाऱ्यांची मिळकतखोरी व भ्रष्टाचार उद्‌भवू नये.

**रचनात्मक कार्यक्रम :–**

**१. सामाजिक एकोपा –**

जाती, धर्म इ. आधारावर माणसामाणसांमध्ये विभागणी करू नका. व्यावसायिक आधारावर सुद्धा समाज विभाजन अनर्थकारी ठरते. एकोप्याअभावी भारतीय जनता ब्रिटीशांपुढे दुबळी ठरली. ब्रिटीश व्यापारी राज्यकर्ते बनले. एतद्देशीय आपसांत भांडत राहीले. सहकार्य–सहिष्णूता–सहभाग या अस्पृश्यांसह लोकशाहीचे रक्षण अशक्यप्राय आहे. वांछोटी सांसदीय वेश्यागिरी अवांछनीय आहे.

**२. दारूबंदी –**

दारूने कोणतीही समस्या सुटत नाही. उलट व्यक्तिची शारीरीक, मानसिक क्षमता ढेपाळते. तो आळशी, निकष्टी, विवेकहीन बनतो. म्हणून शासनाने दारूबंदी राबविली पाहीजे. दारू प्राशन करणाऱ्याची रोगप्रतिकारकक्षमता लयाला जाते. खून–मारामाऱ्या होतात. दारूडे कामगार कामचुकार बनतात. परिणाम राष्ट्रात उत्पादनयंत्रणा अडचणीत येते. शिक्षणप्रसार, मनोरंजनाची साधने, व्यायामशाळा उभारल्या पाहीजे.

**३. खादी –**

म. गांधीजींना खादी व्यवसाय कोट्यावधी भारतीयांना जोडणार, एकमेक ठेवणारा सूत्रधार वाटतो. कापूस पिकविणारा शेतकरी आणि वस्त्र वापरणारा ग्राहक यात कापडनिर्मितीची प्रक्रिया अन्योन्याश्रयी आहे.

ग्रामीण स्वावलंबनाचा तो मुलाधार आहे. खादी आणि चरखा हे गांधीवादाचे मुळ सूत्र आज हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. यात सर्वांना सहभागी करून घेता येईल. अशी विविध कामे आहेत.

४. ग्राम उद्योग –

उद्योगासाठी ग्रामीण भागातुन कच्चा माल पुरविला जातो. संत्री, मिरची, टमाटर, बांबु, तेलबिया, हळदी इ. वर आधारीत उद्योग ग्रामीण भागात उभारले पाहीजे. दुभदुभते देणारे कृषीसहाय्यक जनावरे पाळण्याचा व्यवसाय सर्वांत किफायतीचे आहे. ट्रॅक्टरने शेतीची मशागत होईल. ट्रॅक्टरीणबाई दुध देणार नाही. शेणखताअभावी जमीन हळी अयोग्य होईल. गावामध्ये जुन्या पध्दतीचे पर्यावरणपूरक व्यवसाय उभारावेत.

५. अस्पृश्यता निर्मूलन –

माणसातील कलंकीत करणारी अस्पृश्यता धर्माने योग्य ठरवावी. यासारखा तकलादूपणा भारताव्यतिरिक्त अन्यत्र नाही. मेलेल्यांची गणती शक्य आहे. अस्पृश्यतेने किती लोकांना हलाहल करून हकनाक मारले? सांगणे न सोपे. विद्यमान राष्ट्रपती रामनाथ कोविंद आर.एस.एस. चे निष्ठावंत शिपाई, पंतप्रधान मोदींचे विश्वासू, त्यांना पुरीच्या मंदिरात प्रवेश नाकारला. यावरून अस्पृश्यतेची पकड लक्षात येते. गांधीजींनी अस्पृश्यता निर्मूलन आंदोलनाने [illegible] भर दिला.

६. बुनियादी शिक्षण –

लोकव्यवहाराशी निगडीत शिक्षण म्हणजे बुनियादी शिक्षण होय. शिक्षणाचा सदुपयोग झाला पाहीजे. व्यवहार कौशल्य, चारित्र्यसंपन्नता आली पाहीजे. शिक्षणाने सर्वांचा विकास करता आला पाहीजे. विनाश [illegible] करता यावा. अक्षरज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे. भुगोल, खगोल, भुमिती, बिजगणित यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात असावा. मनाची चंचलता, तृष्णा थांबविता आली पाहीजे. इच्छाशक्ती सत्वशील असावी. तो स्वतःच्या [illegible] मिळविणारा सज्जन बनावा. नीतीमान नागरीकांची जडणघडण हा बुनियादी शिक्षणाचा प्रमुख हेतु होता. स्थानिक भाषेतुन शिक्षण द्यावे.

७. ग्राम स्वच्छता –

अस्वच्छता समस्त आजाराव्याधींचे माहेरघर ठरते. रस्ते स्वच्छ असावेत. नदी, तलावे विहीरीजवळ घाण करू नये. जनावरे कपडे धुताना त्याची काळजी घ्यावी. प्रत्येकाने घराशेजारील परीसर स्वच्छ ठेवावा. ग्राम स्वच्छता सामुदायिक सहयोगाने अमलात आणावी. कचरा, दुर्गंधीची विल्हेवाट लावावी. पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. रोगच होणार नाही अशी परीसर स्वच्छता राखल्यास दवाखाने डॉक्टर यांची गरज उरणार नाही.

८. स्त्री-उत्थान –

स्त्री आणि पुरुष दोहोवर सांस्कृतिक सभ्यतेचे संगोपन, संवर्धन, संचालन विसंबून आहे. स्त्री एकाची पत्नी ही संकुचित प्रतिमा होय. त्यामुळे तिची प्रतिष्ठा, प्रतिभा लोपायमान होते. त्याऐवजी ती जगतकल्याणी सर्वांची जगन्माता व्हायला हवी. म. गांधीजींच्या सत्याग्रहात आश्रमात पुरुषांबरोबर स्त्रियांनासुध्दा समानूपाती सहभाग व सन्मान होता. ती पुरुषी भोगाची बाहुली नव्हे. शांत व संयमी प्रवृत्तीमुळे तिचा गैरफायदा घेण्यात [illegible] होती. त्यावर ग्रामीण स्तरापासूनच प्रतिबंध आणला पाहीजे.

९. विकेंद्रीकरण –

खेडेगाव हा भारतात लोकशाहीचा पाया होय. त्यांना प्रतिनिधीक लोकशाहीऐवजी प्रत्यक्ष लोकशाही अपेक्षित होती. प्रत्येक गाव स्वतंत्र, स्वावलंबी, स्वयंपुर्ण व्हावे असा त्यांचा मनोदय होता. गावातल्या सर्व गरजा

ISSN : 2348-7143
October-2019

गावातच भागवाव्यात. गावात प्रत्येकाचा दर्जा समान असावा. गावातील लोकांना शांततामय, गौरवशाली जीवन जगता यावे. प्रत्येक खेडेगावातून एक प्रतिनीधी मिळून संघ बनवावेत. गावोगावच्या गरजा भागवाव्यात.

१०.इष्टापती –

पोलीस, सैन्य, न्याययंत्रणा, दंडव्यवस्था निर्माण करावी लागणे म्हणजे आपत्तीचे भयावह वातावरण होय. वकील भांडणे मिटवितात की पेटवितात? गून्हेगारांचा हैदोस वाढल्याने पोलीसयंत्रणा लागते. त्याला चांगले लक्षण म्हणता येणार नाही. निर्ढावलेल्या गून्हेगारांना जेरबंद करण्यासाठी दंड, कैद आकारण्याची पाळी येणे म्हणजे नामुष्कीची पाळी होय. तशा समाजाला कोणीही आदर्श समाज म्हणणार नाही. गून्हेगाराला सुधारण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. त्यांना तुरूंगाऐवजी सुधारगृहात पाठवावे. तुरूंगातील शिक्षक व चौकीदार गून्हेगारांचे मित्र बनून उपचार करतील.

११. भ्रष्ट राज्यकर्त्यांवर नियंत्रण –

राज्याचे कार्यक्षेत्र फक्त कायदा आणि सूरक्षिततेपूरते असावे. व्यक्तिला स्वातंत्र्याचा आस्वाद घेता आला पाहीजे. राज्याने वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनात हस्तक्षेप करू नये. प्रत्येकाला व्यक्तिगत विकासाची संधी मिळावी. प्रत्येकजण स्वत:च स्वत:चा भाग्यविधाता बनावा. कोणावर ही अन्याय न होवू देणारे राज्य म्हणजे रामराज्य असे त्यांना वाटते. त्यात कोणीही दु:खी राहणार नाही. सर्वांच्या सर्व गरजा भागतील. अमर्याद राज्यशासनावर टिका करण्याचा अधिकार आहे. भ्रष्ट राज्यकर्त्यांना विरोध करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

१२.गोहत्या बंदी –

राजा प्रसेनजीत हा भगवान बुध्दांना समकालीन होता. त्याने यज्ञाच्या आयोजनात गाई–बैलादी जनावरांचा बळी देण्यासाठी जनावरांची मोठी दावण सजविली होती. या निरागस जनावरांची निर्मम कत्तल होणार म्हणून चारापाणी करणारे नोकरचाकर मनातल्या मनात तडफडत होते. नंतर राजाचे मार्गदर्शन करून त्या जनावरांना गौतम बुध्दांनी वाचविले. गोहत्या अशी पूरातन विकृती आहे. गायीमुळे बैल दोन्ही विविधपयोगी आणि दुधदूभते देणारे आहेत. ते अत्यंत पौष्टीक असते. जिभेचे चोचले पुरविण्यासाठी गोहत्या चूकीची. अनेकांनी शासनमान्य कत्तलखाने उभारून गोमांस व्यापार सुरू केला. कृषीव्यवस्था विध्वंसाला ते निमंत्रण ठरते. परंतु प्रस्थापित राजकारण्यांची मिलीभगत असल्याने त्यांना कोणी हात लावू शकत नाही. दुधदुभत्यांचा समाजसौष्ठवाचा श्रेष्ठतम व्यापार प्रवर्धित करण्यासाठी गोहत्याबंदी काळाची गरज आहे.

गांधीजी ग्रामराज्याला रामराज्य म्हणतात. तेच परीपूर्ण समाजाचे द्योतक मानतात.

निष्कर्ष –

१. म. गांधीजी म. ज्योतिबा फुलेप्रमाणे सर्वधर्म समभाव मानताना दिसतात. सर्वच धर्मियांनी गुण्यागोविंदाने एकत्रित राहावे अशी अभिलाषा बाळगतात. कोणत्याही एका धर्माची बाजू उचलत नाही.
२. म. ज्योतिबा फुले यांनी 'सत्यशोधक' ही संकल्पना पूढे आणली. सार्वजनिक सत्यधर्म प्रतिपादन केला. म. गांधी सत्याच्या मार्गावरून चालण्यासाठी 'सत्याग्रह' चा संकल्प देतात.
३. राजकारणी गांधीजी धर्मांधाना रूचले नाही. 'अल्लाह ईश्वर तेरो नाम' यात निर्मिकाचा धर्म आहे एक, भांडणे अनेक कशासाठी? हा म. फुलेंचा दृष्टीकोन दिसतो. परंतु ते धर्मांध अल्ला भक्त अथवा धर्मांध ईश्वरभक्तांना कळले नाही. रामाच्या प्रतिमा पूजनामुळे ते मुस्लिमांना परके वाटले. इस्लामिक सौजन्य कथनामूळे ते हिंदूनाही आपलेसे वाटले नाही.

४. हिंदू-मुस्लिम एकोपा हा त्यांच्या विचारधारेचा, राज्याचा मूलाधार होता. नेपाळात गौतम बुद्धापासून अहिंसेचा बोध मिळाला. समकालीन वैचारिकता लक्षात घेऊन त्यांना बुद्ध विचाराचे प्रतिपादन अवघड ठरले. बुद्धाने स्थानिक भाषेत प्रबोधन करून स्थानिक लोकांना जागृत केले. सजग, सक्षम केले. राजकारणाच्या धुमश्चक्रीत म. गांधी प्रतिके, प्रतिमा, प्रतिमाने यांची अचूक सांगड घालण्यात अपयशी ठरले. मात्र त्यांनी सुध्दा स्थानिक भाषेचा आग्रह धरला.

५. ग्राम-स्वराज्य, आदर्श राज्य आणि रामराज्य या तिन्ही वेगवेगळ्या अन्वयार्थाला, प्रारूपाला प्रतिबंधीत करतात. त्या मागील तात्विक पार्श्वभूमी वेगवेगळी आहे. विचार, आचार, श्रध्दा, उपासनांच्या वैविध्यपूर्ण भारतात आराध्याची निश्चित कोंडी करून चालणार नाही. तशी कोंडी एका धार्मिकाकडे केंद्रीत होत जाते.

**उपाययोजना –**

१. स्वार्थांध सोयीच्या दोषदर्शनात दुसऱ्यांचा बळी जाऊ देवू नये.
२. दुष्टांना प्रतिबंधीत करणाऱ्या राष्ट्रभाव उत्थानांना व्यावहारीक निकृष्टता नसावी.
३. गुणांवर आधार घालून सदाचार जोपासल्यास निरोगी समाजाची उभारणी होवू शकते.
४. स्वतःची वैगुण्ये झाकण्यापेक्षा दुसऱ्याचे सद्गुण अंगिकारण्याची पराकाष्ठा करावी.
५. नश्वर तन, दुष्कर मन यांच्या कचाट्यात पडण्यापेक्षा शुद्ध पवित्र मनाची कास धरावी. श्रेष्ठ धर्माचा शोध उत्तम मार्ग होय.
६. भावनेपेक्षा वस्तुस्थितीने परिमार्जन करण्यावर भर द्यावा.

फकीर नही जानता लकीर,
फरीश्ते तेरी दुआँए बेनजीर।
कंगाल कुछ नही देता किसीको,
फिर भी अदब से बडे-बडे झुकाते है सिर।।

**संदर्भ –**

१. प्रकाश भारदे, श्री. शि. 'स्त्री जीवन' महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधीभवन कोथरूड, पुणे-४११ ०२९. (१९८८ – तृतीयावृत्ती)
२. प्रकाशक : उपाध्याय मार्तण्ड, गांधीजी की अंतिम जेल, कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, सस्ता साहित्य मण्डल नई दिल्ली (१९७२)
३. गांधी, मो. क. 'सत्य के प्रयोग अथवा आत्मकथा' नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद. (१९८९)
४. लाहीरी, आशुतोष 'गांधी इन इंडीयन पॉलीटिक्स' फर्मा केएलएम प्रा. लि. गांगुली स्ट्रीट, कलकत्ता. (१९७६)
५. गांधी, एम. के. 'कन्स्ट्रक्टीव्ह प्रोग्राम, इटस् मिनींग अॅन्ड प्लेस' नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद. (१९८१)
६. संपादक नरके, हरी 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' महात्मा ज्योतिबा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई. (२०१३)